लोकमत

# संशोधनाच्या चाकाला गती !

## नवभारताच्या निर्मितीचे स्वप्न साकार होणे शक्य



डॉ. व्ही. एन. शिंदे
उपकुलसचिव
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**स्वातंत्र्यपूर्व** काळात डॉ. सी. व्ही. रामण यांनी आपले नोबेल पारितोषिकप्राप्त संशोधन इंडियन असोसिएशन फॉर कल्टिवेशन ऑफ सायन्सेस येथे केले होते. तेथेच त्यांनी रामण परिणाम शोधला. आज भारतात संशोधन चालतच नाही असे नाही. अवकाश संशोधन आणि अणुशक्ती या दोन क्षेत्रांतील भारताची प्रगती जागतिक दर्जाची आहे. मात्र, हे अपवाद. अन्य क्षेत्रात आज पूर्वीसारखे वातावरण आणि संस्कृती पुन्हा निर्माण करण्याची गरज लक्षात घेऊन नव्या शैक्षणिक धोरणामध्ये तरतुदी करण्यात आल्या आहेत.

उच्च शिक्षण देणाऱ्या संस्थांना तीन गटांमध्ये विभागण्यात आले आहे. यातील पहिल्या गटातील संस्था या संशोधनाचे आणि पूरक अध्यापनाचे काम करतील. दुसऱ्या गटातील संस्थांमध्ये उच्च दर्जाचे अध्यापन करण्यात येईल, तसेच पूरक संशोधनही चालेल. या दुसऱ्या गटातून तयार झालेले विद्यार्थी पहिल्या गटातील संस्थांसाठी उपयुक्त ठरतील. तिसऱ्या गटातील संस्थांमध्ये पदवीपूर्व अध्यापनाचे कार्य चालणार आहे. त्यांच्यावर संशोधनाचे ओझे टाकलेले नाही. बारावीनंतर विद्यार्थ्याला आपणास पुढे काय करावयाचे, हे निश्चित करावे लागणार आहे आणि त्यानुसार अभ्यासक्रम, शाखा व कालावधी निश्चित करावा लागेल. यामुळे पुढे होणारी गर्दी व वाद टाळले जातील. विद्यार्थ्याने दिशा निश्चित केलेली असल्याने त्याला उद्दिष्टपूर्ती सुलभ होईल.

नव्या शैक्षणिक धोरणाची रचना आणि अपेक्षा रास्त आहेत. सर्व स्तरांवरील शिक्षणामध्ये मोठे बदल अपेक्षित आहेत. या धोरणाची योग्य पद्धतीने अंमलबजावणी झाल्यास नवभारताच्या निर्मितीचे स्वप्न साकार होणे शक्य आहे. आजवर अनेक चांगली धोरणे आली. मात्र, अंमलबजावणीतील त्रुटींमुळे अपेक्षित उद्दिष्टपूर्ती झाली नाही. या धोरणाची अंमलबजावणी करताना संशोधनाचे रुतलेले चाक नक्कीच गतिमान होईल!

* या पानावरील 'ऊर्जा' या सदराचा मजकूर जागेअभावी प्रसिद्ध झालेला नाही.

# विद्यापीठात पत्रकारिता अध्यासनाच्या ऑनलाईन अभ्यासक्रमाला प्रवेश सुरू

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या पद्मश्री कै. डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासनाच्या वतीने सुरू असलेल्या पी. जी. डिप्लोमा इन ऑनलाईन जर्नालिझम या अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे. १० ऑगस्टपर्यंत विद्यार्थी या अभ्यासक्रमाला ऑनलाईन प्रवेश घेऊ शकतात.

कोणत्याही शाखेची पदवी प्राप्त केलेला विद्यार्थी या अभ्यासक्रमाला प्रवेश घेऊ शकतो. वयाची कोणतीही अट नाही. हा एक वर्षाचा पदविका अभ्यासक्रम आहे. पत्रकारितेत पारंपरिक माध्यमांबरोबरच डिजिटल माध्यमांना अलीकडे खूप महत्त्व आलेले आहे. नवमाध्यमांचे तंत्र अवगत असणाऱ्यांना नोकरी मिळण्याची शक्यता अधिक आहे. याशिवाय डिजिटल माध्यमांच्या सहाय्याने स्वयंरोजगाराच्या संधीही उपलब्ध आहेत. या दृष्टिकोनातून हा पदविका अभ्यासक्रम राबविला जात आहे. सोशल मीडिया, डिजिटल प्लॅटफॉर्म, मोबाईल पत्रकारिता, ऑनलाईन एडिटिंग, डॉक्युमेंट्री, ऑडिओ-व्हिडिओ पत्रकारिता, कायदे आणि आचारसंहिता, डेटा पत्रकारिता यासह अन्य विषय या अभ्यासक्रमात शिकविले जातात.

शनिवार आणि रविवार या दोन दिवशी या अभ्यासक्रमाचे वर्ग भरतात. अधिक माहितीसाठी अध्यासनाचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.